RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ५२] बुधवार, नोव्हेंबर १७, २०२१/कार्तिक २६, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ६९

## प्राधिकृत प्रकाशन

### सक्षम प्राधिकारी (हायस्पीड रेल), तथा उपविभागीय अधिकारी, पालघर उपविभाग, पालघर यांजकडून

**मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये**

**घोषणा**

क्रमांक पीडी/भू.सं./हायस्पीड रेल/अधिसूचना-१९(१)/कावि-७५५/२०२१.— ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन दिनांक २९ जून २०२० व दिनांक १ डिसेंबर २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशिलावर विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतूदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलावर वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

### (१) गावाचे नाव-अंबाडी, ता. जि. पालघर

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्र. | जमिनीचा प्रकार | जमिनीचे स्वरुप | अंदाजित क्षेत्र हे.आर मध्ये (खाजगी) |
|---|---|---|---|---|
| १ | २/५ | खाजगी | शेती | ०.११०० |
| २ | ६/२/अ | खाजगी | शेती | ०.३२२० |
| ३ | ६/२/ब | खाजगी | शेती | ०.०४८० |
| ४ | ७/१ | खाजगी | शेती | ०.२५६० |
| | ७/२ | | | |
| | | | **एकूण** | **०.७३६०** |

### (२) गावाचे नाव-रोठे, ता. जि. पालघर

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्र. | जमिनीचा प्रकार | जमिनीचे स्वरुप | अंदाजित क्षेत्र हे.आर मध्ये (खाजगी) |
|---|---|---|---|---|
| १ | १३/३३ | खाजगी | शेती | ०.०००५ |
| २ | १२/३ | खाजगी | शेती | ०.०२७५ |
| ३ | १०/अ | खाजगी | शेती | ०.०६५७ |
| ४ | ११ | खाजगी | शेती | ०.०३४० |
| ५ | ८/२/अ | खाजगी | शेती | ०.११७० |
| ६ | ८/५/अ | खाजगी | शेती | ०.१३५५ |
| ७ | २५/१/अ | खाजगी | शेती | ०.०८१४ |
| ८ | २५/१/ब | खाजगी | शेती | ०.१११३ |
| ९ | २७/क | खाजगी | शेती | ०.३८१० |
| | | | **एकूण** | **०.९५३९** |

### (३) गावाचे नाव-कमारे, ता. जि. पालघर

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्र. | जमिनीचा प्रकार | जमिनीचे स्वरुप | अंदाजित क्षेत्र हे.आर मध्ये (खाजगी) |
|---|---|---|---|---|
| १ | १६५ | खाजगी | शेती | ०.०१३९ |
| २ | १६४ | खाजगी | शेती | ०.११४५ |
| ३ | १५९ | खाजगी | शेती | ०.१४८६ |
| ४ | १५४ | खाजगी | शेती | ०.०९५९ |
| ५ | १५३ | खाजगी | शेती | ०.०००४ |
| ६ | १५१ | खाजगी | शेती | ०.०७०१ |
| ७ | १४९ | खाजगी | शेती | ०.०१०१ |
| ८ | १४८ | खाजगी | शेती | ०.१८९४ |
| ९ | १४६ | खाजगी | शेती | ०.१२६३ |
| १० | १४५ | खाजगी | शेती | ०.०००५ |
| ११ | १३९ | खाजगी | शेती | ०.०२८२ |
| १२ | १४० | खाजगी | शेती | ०.२५१३ |
| १३ | ११७/५८ व ११७/६२ | खाजगी | शेती | ०.०४०६ |
| | | | **एकूण** | **१.०८९८** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| प्रकल्पाचे नाव | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प जिल्हा पालघर |
|---|---|
| प्रकल्पाच्या कामाचे वर्णन | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प<br><br>रेल्वे मंत्रालय, भारत सरकार यांनी भारतीय रेल्व योजना २०२० तयार केली आहे आणि त्या योजनेचा दस्तऐवज डिसेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. सदर प्रकल्प जपान सरकारच्या सहाय्याने कार्यन्वित करावयाचा आहे. प्रकल्पाची एकूण लांबी ही ५०८.१७ कि.मी. असून त्यापैकी १५५.६४२ कि.मी. लांब इतका रेल्वे मार्ग महाराष्ट्र राज्यामधून (बोगद्यातून २७ कि.मी. व १२७.६४२ उन्नत मार्ग) जातो. महाराष्ट्र राज्यातील या अंतरामध्ये ४ स्थानके (बांद्रा-कुर्ला-संकुल, ठाणे-विरार व बोईसर) नियोजित केले आहेत. रेल्वे चालनाचा वेग प्रति तास ३२० कि.मी. इतका असेल. |
| समाजाला होणारे लाभ | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पामुळे जलदगती रेल्वेप्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे, व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br><br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगारच्या संधी मिळतील.<br><br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत. |

## अनुसूची-तीन

### बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

१. प्रकल्पाचे बांधकाम

२. प्रकल्पाचे परिचालन

३. प्रकल्पाची देखभाल

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता.

## अनुसूची-चार

**भूमी संपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १०८ नुसार १) जमिनीचे मुल्यांकन व २) पुनर्वसन व पुनर्स्थापना अंतर्गत घटकांबाबत राज्य शासनाने धोरण निश्चित केलेले आहे, त्यानुसार मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाकरीता भूमी संपादन अधिनियम, २०१३ मधील दुसऱ्या अनुसूचीनुसार तसेच महाराष्ट्र पुनर्वसन व पुनर्स्थापना अंतर्गत घटक-**

(१) जर ग्रामीण भागात घर गमावले तर इंदिरा आवास योजनेच्या निकषानुसार बांधलेले घर किंवा त्याऐवजी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम देय राहील. किमान रु. १,६५,०००/-

(२) जर शहरी भागात घर गमावले तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषानुसार ५० चौ.मी. जोते क्षेत्र असलेले घर किंवा त्याऐवजी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम देय राहील. किमान रु. ५.५ लाख देय राहील.

(३) जर कुटूंबात रोजगारासाठी पात्र उमेदवार असेल अशा प्रत्येक बाधित कुटूंबाला एकदाच ५ लाख रुपये दिले जातील.

(४) बाधित स्थलांतरीत कुटूंबाला दरमहा रु. ३,०००/- निर्वाह भत्ता स्थलांतराच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती आणि जमातींच्या अशा कुटूंबांना अतिरिक्त रु. ५०,०००/- देय राहील.

(५) बाधित स्थलांतरीत कुटूंबाला रु. ५०,०००/- वाहतूक खर्च देय राहील.

(६) ज्या कुटूंबाकडे जनावरांचा गोठा किंवा छोटे दुकान होते, अशा कुटूंबाला एकदाच रु. २५,०००/- आर्थिक मदत देय राहील.

(७) कारागीर, छोटे व्यापारी यांना एकदाच रु. ५०,०००/- अनुदान देय राहील.

(८) घर बदलल्यानंतर एकदाच रु. ५०,०००/- पुनर्स्थापना भत्ता देय राहील.

(९) पुनर्वसन झालेल्या व्यक्तीच्या केवळ पहिल्या व्यवहारासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क हे संबंधित संपादन संस्थेकडून भरले जाईल.

(१०) बाधित व्यक्तीने लेखी स्वरुपात संमती दिली तर वर उल्लेख केलेले पॅकेज अनुज्ञेय होईल.

## अनुसूची-पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर |
| ब. | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हाधिकारी कार्यालय, रुम नं. ११३, पहिला मजला, कोळगांव, ता. पालघर, जि.पालघर |
| क. | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील | **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार-ब वर्ष ५, अंक ९२(२) गुरुवार, जुलै ११, २०१९/आषाढ २०, शके १९४१, महसुल व वन विभाग, अधिसूचना दिनांक ०९ जुलै २०१९ अन्वये उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. |

**धनाजी तोरस्कर,**
उप विभागीय अधिकारी,
पालघर उप विभाग, पालघर.

पालघर,
दिनांक १६ नोव्हेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.